Vol 7 Issue 2 Nov 2017

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017

# *एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या आंगणवाडीतील बालकांना मिळणाऱ्या सेवेविषयी अध्ययन*



*डॉ. सुरेश ए. भागवत*
*(एम. कॉम, एम.फिल, पी.एच.डी.)*
*डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यु. एस. महाविद्यालय, नागपूर.*

*सारांश–*

आजची मुले उद्याचे नागरिक आहेत. म्हणून आज जर बालकांना योग्य शिक्षण दिले, त्यांना प्रेरित केले, तर भारताचे समर्थ व संपन्न नागरिक बनू शकतात. आज बालकांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर मोठया प्रमाणात विविध प्रकारच्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी व्हावी याकडेही लक्ष दिल्या जात आहे.

बालविकासाला अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यासाठी खेडयांच्या पातळीवर महत्त्वाचे बदल करावे असा एकात्मिक बालविकास सेवेचा इरादा आहे. हे बदल घडविण्याचे संस्थात्मक साधन सध्या आंगणवाडी आहे. आंगणवाडीमुळे उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवेचा मुलांना लाभ मिळू शकतो. तसेच वेगवेगळया सरकारी, बिगरसरकारी व सामाजिक साधनसंपत्तीचा वापर करून त्यांना मानसिक चालनाही दिली जाते. यातून स्थानिक पातळीवर अनपेक्षित बदल झालेले आढळतात. एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या आंगणवाडीतील बालकांना मिळणाऱ्या सेवेविषयी संशोधनकर्त्याला काय वाटते हे शोधण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे केला आहे.

## *प्रस्तावना*

"देशाच्या विकास कार्यक्रमांच्या विषय पत्रिकेवर बालविकास हा अग्रक्रम असलेला विषय आहे. बालक जीवन हे निरागस जीवन आहे. म्हणूनच नव्हे तर ती देशाची सर्वोत्तम मालमत्ता आहे. ती देशाच्या भविष्यकालीन विकासाची गंगोत्री आहे." अशा अर्थपूर्ण विधानांनी देशाच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेने (२००२ ते २००६) या देशात जन्मणारी अर्भके भारत भाग्यविधाता असल्याचे नमूद करुन ठेवलेली आहे. अशा ठामपणे केलेल्या निष्कर्षाच्या पार्श्वभूमीवर एखाद्याला असा प्रश्न विचारावासा वाटेल की, भारताचे भवितव्य उज्वल करण्यासाठी देशातील सरकारनी कोणत्या योजनेवर गुंतवणूक करावी? या प्रश्नाचे उत्तर वर उद्धृत केलेली सत्य विधाने आहेत. ज्या गुंतवणूकीमधून भरपूर लाभ पदरी पडावा अशी अपेक्षा आहे. तर मग प्रत्येक भारतीय मुलाच्या विकासाची दृष्टी ठेवून जोपासना करणे जरुरीचे ठरते. प्रथिने, ऊर्जा, निःसत्व पोषण (PCM) किंवा कुपोषण या पद्धतीने बालकाचे वय आणि वजन याबाबत प्रमाणशिरता चाचणी केली जात असते. बालकाची वाढविषयक चाचणी करण्याची ही उत्तम पद्धती आहे. गेल्या तीन दशकात केलेल्या पाहणीवरुन दिसून येत आहे की, भारतातील बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण घटत चाललेले आहे. निःसत्व पोषण होणाऱ्या बालकांच्या संख्येचा आणि परिस्थितीचा आढावा घेतला असता बालकांना निःसत्व पोषणाची बाधा होण्याचे प्रमाणही घटले आहे. परंतु अत्यल्प आणि अल्प प्रमाणातील निःसत्व पोषणाच्या अभावी तो कुपोषण संसर्गाला सहज बळी पडू शकतात. अशा अनारोग्याच्या परिस्थितीत अनेक बालके जगत असल्याचे आढळून आले आहे. किमान शारीरिक क्षमता आणि बौद्धिक पात्रता या बाबतीत ती वाढ खुरटलेल्या अवस्थेत जगतात परिणामतः त्यांना उपलब्ध शालेय शिक्षणाचा पूर्णापणे लाभ घेणे शक्य होत नाही. अशा या अत्यल्प आणि अल्प प्रमाणातील निःसत्व पोषणाच्या परिस्थितीमुळे निःसत्व पोषण ही लोकजीवनाच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये अदृश्यस्वरुप व्याधी प्रवाहीत आहे. बालकामधील निःसत्व पोषण त्यांच्या प्रकृतीवरुन उघडपणे दिसून येते. अशा बालकांची वाढ आणि विकास या बाबतीत वैद्यकीय निदान चाचण्या करुन उपाय योजना अंमलात आणता येतात. शालेय जीवनपूर्व काळातील बालकाचे निःसत्व पोषण हे त्याच्या वाढखुंटण्यामागील महत्त्वाचे कारण आहे. NFHS२ या पाहणीमधून तीन वर्षे वयोगटात ४५.५ टक्के बालकांचे वय आणि उंची प्रमाणशिरतेमध्ये खच्चीकरण झालेले आहे. तर वय आणि वजन प्रमाणशिरतेमध्ये १५.५ टक्के बालके गळालेली आहेत. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासावरून रूढी, परंपरा, नीतीनियम हे कुटूंबातच मुलांना मिळत होते. म्हणून कुटूंबाला प्राथमिक शिक्षणाचे केंद समजत असत. प्राचीन काळी संयुक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात होती. दोन-तिन किंवा त्यापेक्षाही जासत भावांचे कुटूंब एकत्र असायचे. परंतु अलीकडे या पध्दतीत बदल होऊन विभक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात आली. माता पित्यांना मुलांकडे लक्ष देणे अशक्य झाले त्यामुळे

संस्कार हरपले. परिणामी मुलांच्या संगोपणाचे कार्य निरनिराळया संस्थांनी हाती घेतले.

विभक्त कुटूंबातील पती-पत्नी अर्थप्राप्तीच्या हेतूने अथवा नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडल्यानंतर घरी कोणतीही जबाबदार व्यक्ती मुलांना सांभाळावयास उपलब्ध नसल्याने विविध संस्था, पाळणाघरे, आंगणवाडी, बालवाडी शाळा इत्यादीच्या रूपाने मुलांच्या संगोपणाकडे वळल्या. मुलांची काळजी घेणे व त्यावर संस्कार करणे, मुलांचा सर्वांगीन विकास घडवून आणणे या विचारसरणीचीही जोपासना होऊ लागली. आंगणवाडीच्या शिक्षणामुळे मुलांना चांगली शिस्त लावता येते का? त्यातील शिक्षणामुळे काही विकासात्मक बदल जाणवतो का? आंगणवाडीचे शिक्षण बालकाचे सामाजिक व मानसिक स्वास्थ घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत आहे का? आंगणवाडीत बालकांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा कितपत पोहचतात आणि या सोयीमुळे सेविका समाधानी आहेत का? हे शोधण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

भारत हा जगातला बालकांची सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. देशाच्या विकास कार्यक्रमांच्या पत्रिकेवर बालविकास हा अग्रक्रम असलेला विषय आहे. परंतु ज्या योजना बालविकासाच्या दृष्टीने राबविण्यात येत आहेत त्यासंबधी काही प्रश्न सहजच मनात निर्माण होतात.

ज्या योजना बालकांसाठी आहेत ती त्यांच्यापर्यंत पोहचते का? तिची कार्यवाही कितपत परिणामकारक आहे? साधनसामुग्रीचे जे एकत्रीकरण योजनाकारांना अभिप्रगत होते तसे प्रत्यक्षात येते काय? मुलांच्या जीवनमानावर दृष्य असा प्रभाव पडला आहे काय? नव्याने समोऱ्या येणाऱ्या गरजा भागविण्यासाठी या सेवांमध्ये पुरेशी वाढ होत आहे काय? लवचिकता येत आहे काय? खर्चाच्या प्रमाणात हा कार्यक्रम कितपत परिणामकारक ठरतो? हे शोधण्याची गरज आज निर्माण झालेली आहे.

संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सामाजिक किमान कार्यक्रमात म्हटले आहे की, "प्रत्येक वस्तीसाठी एक कार्यरत आंगणवाडी उपलब्ध करून तसेच सर्व बालकांना लाभ कक्षेत आणून केंद्रीय पुरोगामी आघाडी एकात्मिक बालविकास योजनेचे सार्वत्रिकीकरण करेल. मा. केंद्र शासनाचे वचन आणि आयुक्ताचा अहवाल परस्पर विरोधी असल्याचे दिसते. देशभरात सध्या फक्त सात लाख आंगणवाडया आहेत. देशात १४ लाख आंगणवाडयांची आवश्यकता असल्याचा अंदाच सादर करण्यात आला होता. मात्र भारत सरकारने २००६ मध्ये तो अस्विकृत केला. वस्तीची लोकसंख्या १००० असल्यास ६ वर्षाखालील बालकाची संख्या १५० ते १६०, गर्भवती स्त्रीया किंवा स्तनदा मातांची संख्या ३५ ते४० व किशोरवयीन बालकाची संख्या ७५ ते ८० असेल तर २००१ मधील जनगणनेच्या आधारे काढण्यात आले.

## *संशोधन उद्दिष्टे*

१.एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या लाभार्थी महिलांची आर्थीक स्थिती चेअध्ययन करणे.
२.एकात्मिक बाल विकास प्रकल्पाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांविषयी महिलांच्या मतांचे अध्ययन करणे.
३.महिलांना दिल्या जाणाऱ्या पोषक आहार व आरोग्य शिक्षण या सेवांविषयी महिलांच्या मताचे अध्ययन करणे.
४.महिला लसीकरणासंबंधी कितपत जागृत आहे याचे अध्ययन करणे.

संशोधनाची सुरूवात ही वैज्ञानिक पध्दतीप्रमाणे विषयाच्या निवडीपासून होते. त्याकरीता संशोधनकर्ताला कोणत्या विषयाच्या संदर्भात संशोधन करावयाचे आहे हे निश्चित करण्यासाठी त्यांच्या समोर समस्या असून त्याची माहिती असणे आवश्यक असते. या दृष्टिकोनानुसार एकात्मिक बालविकास योजनेच्या अंमलबजावणीचे अध्ययन बाबतचा अभ्यास करणे संशोधनकर्ताला आवश्यक वाटले.

त्याकरिता संशोधनकर्ताच्या पुर्व महितीनुसार असे निदर्शनास आले की, ग्रामीण, आदिवासी व शहरी गलिच्छ भागात राहणाऱ्या गरोदर महिलांमध्ये अशिक्षीतपणा, अज्ञान, कमी शिक्षण यांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे स्वच्छता, रोगराईचे प्रमाण, बालकांचे कुपोषण, आहाराबातच्या चुकीच्या सवयी, असमतोल आहार, योग्य वेळी आहार न घेतल्यामुळे तसेच व्यसनामुळे पोषक तत्व न मिळणे त्यामुळे कुपोषण, बालमृत्यु, मातामृत्यू, अपंगत्व इ. चे याच भागात जास्त प्रमाण दिसून येते. ते कमी करणे किंवा नियंत्रणात आणणे यासाठी निरोगी समाज निर्माण करण्यास एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजना सुरू करण्यात आली. या सेवेनुसार पुरक आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, आहार व आरोग्य विषयक शिक्षण, तसेच अनौपचारिक पुर्व प्राथमिक शिक्षण यासारखे अनेक उपक्रम एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत राबविण्यात आले.

**सारणी क-1 एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या लाभार्थी महिलांची**

| आर्थीक स्थिती | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | १०६ | २३.५ टक्के |
| सहमत | १८० | ४० टक्के |
| अनिश्चित | ८८ | १९.५ टक्के |
| असहमत | ५१ | ११.५ टक्के |
| पुर्णता असहमत | २५ | ५.५ टक्के |
| एकुण | ४५० | १००.०० |

**आर्थीक स्थिती कमकुवत हे दर्शविणारी सारणी**

स्त्रोत : प्रश्नावली वरून

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ४५० लाभार्थी पैकी १६० लाभार्थी हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ४० इतकी आहे. १०६ लाभार्थी हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २३.५ इतकी आहे. ८८ लाभार्थी हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी १६.५ इतकी आहे. परंतु ५१ लाभार्थी हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ११.५ इतकी आहे.

### *सारणी क–2 एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या लाभार्थी महिलांची आर्थीक स्थिती कमकुवत आहे. या विधानाला उत्तरदात्याद्वारे प्रदान करण्यात आलेली सरासरी गुणदर्शविणारी सारणी*

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| ४५० | ३.७ | १०.९२ | ०.१७ | १ | ५ |

N रू. संख्या; Mean :- मध्यमान, SD :- मानक विचलन;SE :- मानक तृटी; Min :- किमान; Max :- कमाल

वरील सारणी प्रमाणे एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या लाभार्थी महिलांची आर्थीक स्थिती कमकुवत आहे. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.७१ ०.६२ गुण प्रदान करण्यात आले. याचाच अर्थ असा की, बहुतांश उत्तरदाते या विधानासंबंधी अनिश्चित नाहीत म्हणजेच ते वरील विधानाशी सहमत आहेत.

यावरून एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या लाभार्थी महिलांची आर्थीक स्थिती कमकुवत आहे.

### *सारणी क–3 बहुतांश महिलांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती दर्शविणारी सारणी*

| सेवांची माहिती नाही | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | १०१ | २२.४४ टक्के |
| सहमत | १५८ | ३५.११ टक्के |
| अनिश्चित | १०३ | २२.८८ टक्के |
| असहमत | ६३ | १४ टक्के |
| पुर्णता असहमत | २५ | ५.५७ टक्के |
| एकुण | ४५० | १००.०० |

स्त्रोत : प्रश्नावली वरून

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ४५० लाभार्थी महिलांपैकी १५८ लाभार्थी महिला हया वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३५ इतकी आहे. १०१ लाभार्थी महिला हया वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २२.५ इतकी आहे. १०३ लाभार्थी महिला हया वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी २३ इतकी आहे. परंतु ६३ लाभार्थी महिला हया वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी १४ इतकी आहे.

### *सारणी क–4बहुतांश महिलांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती नाही. या विधान बाबत उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुणदर्शविणारी सारणी*

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| ४५० | ३.६ | ±१.०१ | ०.२१ | १ | ५ |

N :- संख्या; Mean :- मध्यमान, SD :- मानक विचलन; SE :- मानक तृटी; Min :- किमान; Max :- कमाल

वरील सारणी प्रमाणे बहुतांश महिलांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती नाही. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६ ̊ १.०१ गुण प्रदान करण्यात आले. म्हणजेच बहुतांश उत्तरदाते या विधानाबाबत अनिश्चित नाहीत याचाच अर्थ असा बहुतांश उत्तरदाते वरील विधानात सहमत आहेत.

या सारणीतील माहिती वरून बहुतांश महिलांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती

नाही.

**सारणी क–5एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत दिल्या जाणाऱ्या पोषण आहार व आरोग्य शिक्षण या सेवांविषयी महिलांना पुरेशी माहिती दर्शविणारी सारणी**

| सेवांची माहिती नाही | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | ११७ | २६ टक्के |
| सहमत | १६६ | ३७ टक्के |
| अनिश्चित | ९० | २० टक्के |
| असहमत | ३६ | ०८ टक्के |
| पुर्णता असहमत | ४१ | ९ टक्के |
| एकुण | ४५० | १००.०० |

स्त्रोत : प्रश्नावली वरून

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ४५० लाभार्थी महिलांपैकी १६६ लाभार्थी महिला हया वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३७ इतकी आहे. ११७ लाभार्थी महिला हया वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २६ इतकी आहे. ९० लाभार्थी महिला हया वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी २० इतकी आहे. परंतु ३६ लाभार्थी महिला हया वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ०८ इतकी आहे.

**सारणी क–6 एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत दिल्या जाणाऱ्या पोषण आहार व आरोग्य शिक्षण या सेवांविषयी महिलांना पुरेशी माहिती नाही.या विधान बाबत उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुण दर्शविणारी सारणी**

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| ४५० | ३.६ | ±०.९६ | ०.२३ | १ | ५ |
| N :- संख्या; Mean :- मध्यमान, SD :-मानक विचलन;SE :- मानक त्रुटी; Min :- किमान; Max :- कमाल | | | | | |

वरील सारणी प्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत दिल्या जाणाऱ्या पोषण आहार व आरोग्य शिक्षण या सेवांविषयी महिलांना पुरेशी माहिती नाही. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६±०.९६ गुण प्रदान करण्यात आले. याचाच अर्थ असा की, बहुतांश उत्तरदाते या विधानासंबंधी अनिश्चित नाहीत म्हणजेच ते वरील विधानाशी सहमत आहेत.

या सारणीतील माहिती वरून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत दिल्या जाणाऱ्या पोषण आहार व आरोग्य शिक्षण या सेवांविषयी महिलांना पुरेशी माहिती नाही.

**सारणी क–7 लसीकरणासंबंधी महिला जागृती दर्शविणारी सारणी**

| लसीकरणासंबंधी जागृती | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | ११२ | २५ टक्के |
| सहमत | १७१ | ३८ टक्के |
| अनिश्चित | ७७ | १७ टक्के |
| असहमत | ५० | ११ टक्के |
| पुर्णता असहमत | ४० | ९ टक्के |
| एकुण | ४५० | १००.०० |

स्त्रोत : प्रश्नावली वरून

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ४५० लाभार्थी महिलांपैकी १७१ लाभार्थी महिला हया वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३८ इतकी आहे. ११२ लाभार्थी महिला हया वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २५ इतकी आहे. ७७ लाभार्थी महिला हया वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी १७ इतकी आहे. परंतु ५० लाभार्थी महिला हया वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ११ इतकी आहे.

*सारणी क–8 लसीकरणासंबंधी महिला जागृत असल्याचे दिसून येते. या विधान बाबत उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुण दर्शविणारी सारणी*

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| ४५० | ३.६ | ±०.८२ | ०.१२ | १ | ५ |
| N :- संख्या; Mean :- मध्यमान, SD :-मानक विचलन;SE :- मानक तृटी; Min :- किमान; Max :- कमाल | | | | | |

वरील सारणी प्रमाणे लसीकरणासंबंधी महिला जागृत असल्याचे दिसून येते. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६०.८२ गुण प्रदान करण्यात आले. याचाच अर्थ असा की, बहुतांश उत्तरदाते या विधानासंबंधी अनिश्चित नाहीत म्हणजेच ते वरील विधानाशी सहमत आहेत.

या सारणीतील माहिती वरून लसीकरणासंबंधी महिला जागृत असल्याचे दिसून येते.

## *निष्कर्ष*

एकात्मिक बालविकास सेवा योजना ख-या अर्थाने बाल संगोपनाच्या आणि बालविकासाचा कार्यक्रम आहे. यात बालकांचा सर्वांगिण विचार केला जातो, आणि त्यांच्या गर्भावस्थेतील तसेच जन्मानंतरचे वातावरण सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळेच या योजना अंतर्गत लाभार्थी स्त्रियांना अविभाज्य स्थान मिळते आणि त्याचा पुरेपूर लाभही मिळतो.एकात्मिक बालविकास योजनेमुळे बालकांच्या कुपोषणाची तिव्रता कमी झाली आहे. गरीब मुलांनादेखील सकस व सात्विक आहार मिळायला लागला. बालकांच्या शारीरिक, मानसिक विकासाला गती मिळाली आहे. जिल्हयातील ग्रामीण जीवनाचा या गंगाणे चेहरामेहराच बदलून गेला आहे.

## *संदर्भग्रंथ सूची*

आगलावे, प्रदिप, २००७, ‘नमुना निवडीचे तंत्र’, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
आगलावे, प्रदिप, २०००, संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
आगलावे, प्रदिप, २००३, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
काळे, प्रेमला, २०००, बाल मानसशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
गणोरकर, मीना, १९८२, बालविकास आणि संबधित क्षेत्र, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.
जुननकर, कुसूम, २०००, मातृत्व आणि बालसंगापण, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
तारणेकर, मीनाक्षी, १९९६, पोषण आणि स्वास्थ्य, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रब्युटर्स, नागपूर.
महाजन, प्रमोद, १९८७, बालकांचे निरामय आरोग्य आणि संगोपण, विमल पब्लिकेशन्स.
खोबे, २००५, महिला व बालकल्याण विभाग, जि. चंद्रपूर अंगणवाडी, मार्गदर्शिका व पुर्व शालेय शिक्षण अभ्यासक्रम पुस्तिका.
महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग द्वारा प्रकाशित मार्गदर्शिका, माता व बालक संरक्षण कार्ड.
शेटे, २००५, एकात्मिक बालविकास सेवा योजना, ग्रामीण प्रकल्प, चंद्रपूर योजनेचे माहिती पत्रक.
बाबर, सरोजनी, स्त्री शिक्षणाची वाटचाल.भातळवंडे प्रकाश, समन्वयातून सेवा.
घाटे, सुमन, सामाजिक विकास व समस्या.
लेले, सुमेधा, बालविकास.
मुळे, आर.आर, शैक्षणिक संशोधनाची मुल्यमापन.
पुरंदरे, निर्मला, बालवाडीताई प्रशिक्षण.
अंगणवाडी सेविका प्रशिक्षण पुस्तिका, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अंगणवाडीतील संग्रहीत चित्र.
आरोग्य पत्रिका, ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र (जाने.२००८).
हमारा घर भारत, सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण मंत्रालय, (जुलै-सप्टेंबर २००६).

हमारा घर, भारत सरकार स्वास्थ एंव परिवार कल्याण मंत्रालय, (जुलै- सप्टेंबर २००७).
जीवनाचा मंत्र, युनीसेफ पुस्तिका.
लोकराज्य, डिसेंबर २००४.
माता बालक संरक्षक कार्ड, महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग.
पुनरुत्पादक आणि बाल, आरोग्य आणि कुटुंब कल्याण.
आरोग्य कार्यक्रम, मंत्रालय भारतसरकार, नवी दिल्ली.
तारणेकर 'आहार आणि पोषण', विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.
महाराष्ट्र राज्य, एकात्मिक बालविकास योजना, मार्गदर्शिका, २००२-०३.
आय.सी.डी.एस., एकात्मिक बालविकास सेवा कार्य, मार्गदर्शिका निर्मीती, केअर इंडिया सहयोग, समाज व महिला कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नोव्हेंबर, १९८५.
आय.सी.डी.एस., भारतातील समन्वित बालविकास सेवा योजना, युनिसेफ प्रकाशित दक्षिण मध्य एशियासाठी विभागीय कार्यालय, नवी दिल्ली.
महिला व बालविकासाच्या योजना, महाराष्ट्र शासन महिला व विकास विभाग मंत्रालय, मुंबई.
आपला महाराष्ट्र, परंपरा व प्रगती, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८५.
भांडारकर डॉ. पु.ल. 'सामाजिक संशोधन पध्दती' महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मीती मंडळ, दुसरी आवृत्तीए १९८१
मुखर्जी रविन्द्रनाथ, 'भारतीय सामाजिक संस्थाएँ' सरस्वती सदन, दिल्ली, १९७२.
नेरकर दिलीप,'श्रमसमस्या व संबंध' नाग मंगेश प्रकाशन १९७५.
नाडगोंडे गुरूनाथ 'सामाजिक आंदोलने' कान्टीनेंटल प्रकाशन, पूणे, १९८६.
रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा', पॉप्युलर प्रकाषन प्रायव्हेट लिमीटेड, ताडदेव, मुंबई, १९९१.
श्रीनिवास एम.एन.,'आधुनिक भारत में सामाजिक परिवर्तन', राजकमल प्रकाशन प्रायव्हेट लिमीटेड, दिल्ली, १९९१
शंकर मालीनी, 'स्वातंत्र्य सौरभ' , स्वातंत्र्याची सुवर्ण जयंती वर्शानीमीत्त जिल्हा प्रषासना तर्फे स्मरणिका, नागपूर, १९९७.
त्यागी, 'श्रम, अर्थशास्त्र आणि समाज कल्याण' जयप्रकाश आणि कंपनी, मिरज, १९९०.
प्रो. वैद्य नी.स.ए 'समाजशास्त्रीय विचार परंपरा' महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मीती मंडळए १९७५.
डॉ. श्रीमती उर्मिला वराडपांडे, 'कुटुंब कल्याण जाणीवा व अभिवृत्ती' एक समाजशास्त्रीय अध्ययन, १९९५.
डॉ. शोभा पाटणे, 'विभीन्न सामाजिक स्तरोंके परिवारो में सामाजिकरण हे सापेक्ष प्रतिमान, एक समाजशास्त्रीय अध्ययन', १९८४
रमेश अ. पांडे, 'विदर्भात एक युवक नेतृत्व' १९९४ (डॉ. श्री. बोबडे)
सुनील गोखले, लोकप्रभा, १४ मार्च १९९३, पान ४१.
मृणालिनी चितळे, स्त्री मासिक, मे १९९०, पान नं. २३-२४.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com